# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.06.2024** **वारःगुरुवार**

---

1. एनडीए च्या नेतेपदी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निवड
2. इंडी आघाडीचीही वर्तमान राजकीय स्थितीवर चर्चा
3. लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जगभरातून अभिनंदन
4. भारतीय लष्कराची निवृत्तीवेतन धारकांसाठीची स्पर्श सेवा आता ठराविक बँकांमध्येही उपलब्ध होणार
5. भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ऍब्डेन फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल आणि
6. वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची विजयी सुरुवात

**<u>मोदी-नेता</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएच्या नेत्यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एकमतानं नेतेपदी निवड केली. गेल्या दहा वर्षात मोदींच्या नेतृत्वातल्या सरकारमुळे देशाचा प्रत्येक क्षेत्रात सर्वंकष विकास झाल्याचा ठराव काल एनडीएच्या नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आला. देशातल्या जनतेनं सलग तिसऱ्या वेळी सक्षम नेतृत्वाला बहुमतानं निवडून दिल्याचंही या ठरावात म्हटलं आहे. सरकारला मतदारांनी सलग तिसऱ्यांदा दिलेली संधी ही ऐतिहासिक घटना असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी या बैठकीत म्हणाले.

मोदींकडे विकसित भारताबाबतचा स्पष्ट दृष्टीकोन असल्याचं म्हणत जगात भारताचा अभिमान वृद्धिंगत करण्यात मोदींची भूमिका मोलाची आहे असं एनडीएच्या घटक पक्षांनी बैठकीत नमूद केलं. दारिद्र्य निर्मूलनासाठी मोदींनी केलेल्या प्रयत्नांचीही या घटक पक्षांनी प्रशंसा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रिय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह यांच्यासह तेलगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार, शिवसेना नेते एकनाथ शिंदे, लोकजनशक्ती पक्षाचे प्रमुख चिराग पासवान, अपना दलाच्या नेत्या अनुप्रिया पटेल, आरएलडी पक्षाचे प्रमुख जयंत चौधरी, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे एच. डी कुमारस्वामी, हिंदुस्तान आवामी मोर्चाचे प्रमुख जीतनराम मांझी आणि जनसेना पक्षाचे पवन कल्याण यांच्यासह एनडीए चे अन्य नेते या बैठकीला उपस्थित होते.

**<u>इंडी-बैठक</u>**

इंडी आघाडीतल्या घटक पक्षांच्या नेत्यांचीही काल नवी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यामध्ये देशातल्या सध्याच्या राजकीय स्थितीबाबत चर्चा झाल्याचं खरगे यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>मुर्मू-भोजन</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्रीमंडळासाठी राष्ट्रपती भवन इथं विशेष भोजनाचं आयोजन केलं होतं. यावेळी केंद्रिय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासह अन्य काही नेते उपस्थित होते.

**<u>जगभरातून-शुभेच्छा</u>**

जगभरातल्या प्रमुख नेत्यांनी सलग तिसऱ्या वेळी लोकसभा निवडणुकीत यश मिळाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी पंतप्रधानांसह एनडीएचं अभिनंदन करुन दोन्ही देशातले मैत्रीपूर्ण संबंध आणखी वृद्धिंगत होतील असं आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<u>युएई-मोदी</u>**

संयुक्त अरब अमीरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. भारताला विकासाच्या वाटेवर आणखी पुढे नेण्यासाठी शुभेच्छा असं नाह्यान यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**स्पर्श-सेवा**

संरक्षण मंत्रालयाच्या लेखा विभागानं बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया आणि उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेसोबत काल नवी दिल्लीत एक सामंजस्य करार केला. या बँकांमध्ये संरक्षण मंत्रालयाच्या निवृत्तीवेतन प्रशासन यंत्रणेची अर्थात स्पर्शची सेवा केंद्रं सुरू करण्याबाबतचा हा करार आहे. स्पर्श हे संरक्षण मंत्रालयानं संरक्षण विभागातल्या निवृत्ती वेतनधारकांसाठी सुरू केलेलं पोर्टल आहे. तांत्रिक अडचणींमुळे ज्या दुर्गम भागातल्या निवृत्तीवेतनधारकांना या पोर्टलचा लाभ घेता येत नाही त्याच्यासाठी ही बँक सुविधा सुरू केली असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या सुविधेद्वारे निवृत्तीवेतनधारकांना त्यांची माहिती अद्ययावत करणं, तक्रारी नोंदवणं, दरवर्षी डिजिटल ओळख तपशील सादर करणं यासह मासिक निवृत्तीवेतनाचे तपशील मिळवणं शक्य होणार आहे.

**त्रिशक्ती प्लास्टिक**

भारतीय लष्कराच्या त्रिशक्ती तुकडीनं काल अनेक पर्यावरणपूरक उपक्रम सुरू करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. याअंतर्गत सिक्कीममध्ये चंगू इथं प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पात प्लास्टिकचा पुनर्वापर करुन रस्तेबांधणी तसंच विटा बनवण्यासाठीचा कच्चा माल तयार केला जाणार आहे. यातून स्थानिकांना रोजगार मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेतही चांगला बदल घडेल. पर्यावरण संवर्धनासाठी भारतीय लष्कराकडून केल्या जात असलेल्या प्रयत्नांची वरीष्ठ अधिकाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनीही प्रशंसा केली आहे.

**हवा-जागृती**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राजधानी दिल्ली परिक्षेत्राच्या हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं राज्य व्यापार महामंडळाच्या इमारतीतल्या विविध कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जनजागृती मोहीम राबवली. जमिनीचा कस कायम राखणं, वाळवंटीकरण रोखणं आणि दुष्काळाचा सामना या संकल्पनेवर या मोहीमेचा भर होता. यामध्ये पथनाट्य, गाणी आदींद्वारे जनजागृती करण्यासह वृक्षारोपणही करण्यात आलं.

**मैती**

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं युनेस्कोच्या दक्षिण आशियाई विभागाच्या सहकार्यानं काल नवी दिल्लीत कृत्रिम बुद्धीमत्तेचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि नैतिक वापर याविषयी कार्यशाळा आयोजित केली होती. वापरकर्त्याला हानी पोहोचवणार नाही आणि नवसर्जनाला प्रोत्साहन देईल अशा सुरक्षित आणि विश्वासार्ह कृत्रिम प्रज्ञेची निर्मिती गरजेची असल्याचं मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव अभिषेक सिंग यांनी यावेळी स्पष्ट केलं. तर कृत्रिम प्रज्ञेबाबत संतुलित दृष्टीकोन स्वीकारण्याचं भारताचं धोरण आहे असं मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद यावेळी म्हणाले. देशभरात कृत्रिम प्रज्ञेच्या समान आणि शाश्वत वापराला प्रोत्साहन देणारं धोरण आखण्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणं हा या कार्यशाळा आयोजनाचा उद्देश होता.

**सुनिता विल्यम्स**

भारतीय वंशाची एकोणसाठ वर्षीय सुनिता विल्यम्स बोईंग स्टारलायनरच्या पहिल्या मानवी मोहिमेत अंतरिक्षात प्रवास करणारी पहिली अंतराळवीर ठरली आहे. सुनितासोबत 61 वर्षांचे बच विलमोर देखील असून हे दोघे आठवडाभर अंतरिक्ष स्थानकावर राहिल्यानंतर पृथ्वीवर परत येतील.

**टेनिस**

पॅरीस इथं सुरू असलेल्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ऍब्डेन यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्यांनी बेल्जियमच्या सँडर गिल आणि जोरान लिगेन या जोडीवर 7-6, 5-7, 6-1 अशा सेटसमध्ये मात केली.

**क्रिकेट**

आयसीसी टी-20 विश्व करंडक स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात भारतानं आयर्लंडचा 8 गडी राखून पराभव केला. न्यूयॉर्कमध्ये काल रात्री झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडचा संघ 16 षटकांत 96 धावा करु शकला. हार्दिक पंड्यानं तीन तर जसप्रीत बुमराहनं दोन गडी बाद केले. भारतानं तेराव्या षटकात दोन गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केलं. कर्णधार रोहित शर्मानं 52 तर रिषभ पंतनं 36 धावा केल्या. यानंतर भारताचा सामना पाकिस्तानसोबत 9 तारखेला तर सह-आयोजक अमेरिकेसोबत 12 तारखेला होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.